२२ 70

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:१५+९५/कोल्हापूर/२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.संपत पांडुरंग आबदार<br>'अवधूत' जयभवानी कॉलनी, रिंगरोड,<br>फुलेवाडी, कोल्हापूर ४१६०१० |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :सहा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर |

उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे आहे. माहिती खोटी, दिशाभूल करणारी असल्याचे अपीलकर्त्याने दि.१३.११.२००७ व दि.१९.३.२००८ ला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. मात्र ते केवळ भाष्याच्या स्वरुपाचे असून त्यास पुष्टी देणारी कागदपत्रे वा पुरावे सादर केलेले नाहीत. ते करणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराबाबत कारवाई होण्याबाबत अपेक्षा व्यक्त केली आहे. तो भाग माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री.सुभाष अश्रु खैरे,<br>शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि.सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,<br>पुणे - १ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,<br>पुणे - १ |

वरील तीनही घटकात झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याने मागितलेली माहिती प्राप्त झालेली असल्याचे व अपीलकर्त्याचे समाधान झाले असल्याचे नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.३१.०५.२००८

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री.अशोक आण्णा भोसले<br>९० बनवडी कॉलनी नविन, ता. कराड, जि.सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी (म्हाडा), महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास महामंडळ, आगरकर नगर, पुणे - १ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी (म्हाडा), महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास महामंडळ, आगरकर नगर, पुणे - १ |

अपीलकर्त्याने वनवडी कॉलनी गाळा नं.१ ते १३६ या [illegible] गाळ्या संबंधातील माहिती मागितलेली होती. त्यानुषंगाने माहिती मिळाली, अपीलकर्त्याचे समाधान झाले आहे असे वरील तीनही घटकांनी चर्चेअंती नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.३१.०५.२००८

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी पांडुरंग राऊत
'प्रिय बापू' १७२/९/१०, एस.टी.कॉलनी, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६ / सातारा / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी पांडुरंग राऊत
'प्रिय बापू' १७२/९/१०, एस.टी.कॉलनी, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री.रमेश चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एन.एल.कुंभारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.४.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जमीन महसूल अधिनियम अंतर्गत बी टेन्युअर ( ब सत्ता प्रकार )सरकारी भूखंड कोणत्या संस्था, कोणत्या व्यक्तींना मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यास विक्री परवानगी दिल्याची आदेशपत्रे, बी टेन्युअरच्या सरकारी भूखंडाची निर्धारित केलेल्या मूल्यांकनाची व जमा महसूलाची भूखंड व सर्व्हेनंबरनिहाय माहिती |
|---|---|

## विवेचन

जमीन महसूल अधिनियमांतर्गत 'ब' सत्ता प्रकारचे सरकारी भूखंड कोणत्या संस्थांना / व्यक्तींना मंजूर करण्यात आले, त्याबाबतची आदेशपत्रे, मूल्यांकन, विक्री परवानगी दिल्याची आदेशपत्रे इ. माहिती अपीलकर्ता श्री.शिवाजी पांडुरंग राऊत यांनी जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांच्याकडे मागितली होती. मे २००० ते जानेवारी २००७ या कालावधीतील माहितीची मागणी त्यांनी केली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.पी.डी.सूर्यवंशी यांनी 'ब' टेन्युअर हा सत्ताप्रकार जमीन महसूल अधिनियमातील नसून तो सिटी सर्व्हे मॅन्युअल १२५ मधील आहे, असे नमूद करुन नेमकी कोणती माहिती हवी आहे हे स्पष्ट होत नसल्याचे कारण देऊन अर्ज निकाली काढला. तसेच नेमकी कोणती माहिती हवी आहे याबाबत मर्जीतर फेरअर्ज करावा, असे श्री.राऊत यांना कळविले. त्याविरुध्द श्री.राऊत यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अपील केले. मागणी केलेल्या माहितीमध्ये कोठेही मोघमपणा नाही, सुस्पष्टता आहे, त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर चुकीचे आहे. तसेच माहिती देणे आवश्यक आहे, असे नमूद करुन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री.अशोक काकडे यांनी अपील मान्य केले. त्यानंतर त्यावेळचे जन माहिती अधिकारी श्री.एन.एल.कुंभारे यांनी दि.३.४.२००७ रोजी श्री.राऊत यांना पत्र पाठवून माहिती देण्यासाठी १५ दिवसांच्या कालावधीची मागणी केली. दि.१७.५.२००७ रोजी श्री.राऊत यांना त्यांनी शुल्क कळविले. हे शुल्क भरल्यानंतर दि.२१.५.२००७ रोजी श्री.राऊत यांना काही माहिती पुरविण्यात आली व 'संचिका उपलब्ध नसल्यामुळे उर्वरित

माहिती देता येत नाही', असे श्री.कुंभारे यांनी कळविले. त्याविरुध्द श्री.राऊत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षेतील सातारा शहरातील 'ब' सत्ता प्रकाराच्या भूखंडामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून शासनाचा महसूल बुडविला गेला आहे. मनमानी पध्दतीने मूल्यांकन केले आहे व जमीन महसूल अधिनियमाचे उल्लंघन करुन सातारा शहरात जमीन नाही असे खोटे दाखले सादर करुन भूखंडाची देवघेव करण्यात आली आहे. भूखंड हस्तांतर प्रक्रियेतील हे गैरप्रकार लपविण्यासाठीच संचिका उपलब्ध होत नसल्याचे कारण पुढे केले जात आहे, असे श्री.राऊत यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. मुळात मागणी सुस्पष्ट नसल्याचे कारण देऊन जन माहिती अधिकाऱ्यांनी पुन्हा अर्ज करण्यास सांगणे, अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी आणखी १५ दिवसांची मुदत मागणे, दि.३.४.२००५ अशी तारीख नमूद असलेले पत्र प्रत्यक्षात दि.८.५.२००७ रोजी पाठविले जाणे व शुल्क भरल्यानंतरही अपुरी माहिती दिली जाणे हे सर्व काळकाढूपणाचे, भ्रष्टाचार दडवू पाहणारे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा भंग करणारे आहे, असे प्रतिपादन श्री.राऊत यांनी केले. उपलब्ध माहिती दिल्याचे व ऊर्वरित माहिती देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एन.एल.कुंभारे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री.रमेश चव्हाण यांनी सांगितले.

२२ भूखंडांच्या विक्री परवान्याचे आदेश झाले, परंतु १३ भूखंडांचीच माहिती दिली आहे, त्यात एका आदेशाच्या दोन व एका आदेशाच्या तीन प्रती दिल्या आहेत. तसेच काही मूळ कार्यालयीन प्रतींवर जिल्हाधिकाऱ्यांची सही नाही, मात्र माहिती म्हणून दिलेल्या प्रतींवर त्यांची सही आहे. याचा अर्थ स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच भूखंडांच्या मूल्यांकनातही तफावत आहे, असे प्रतिपादन श्री.राऊत यांनी केले. उपस्थित अधिकारी याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता पुढील बाबी स्पष्ट होतात :

जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर व त्यानंतर देण्यात आलेली माहिती लक्षात घेता संबंधित भूखंड व्यवहाराबाबत पारदर्शकता दिसून येत नाही. तसेच माहिती देणे टाळण्याकडेच कल दिसून येतो. एवढ्या महत्त्वाच्या विषयातील मागील सहा-सात वर्षांच्या काळातील संचिका उपलब्ध होत नाहीत हा माहिती दडपण्याचाच प्रकार आहे. पाच-सहा वर्षांपूर्वीच्या संचिका ही 'जुनी माहिती' असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. माहितीची मागणी सुस्पष्ट असताना ती मोघम असल्याचे तकलादू कारण देऊन जन माहिती अधिकारी श्री.सूर्यवंशी यांनी माहिती नाकारली, अपिलीय प्राधिकारी यांनी सूचना दिल्यानंतरही पूर्ण माहिती दिली गेली नाही, 'उपलब्ध' माहिती दिल्याचा खुलासा करतानाच संचिका उपलब्ध होत नसल्याचे कळविले. हे सारे लक्षात घेतले, की माहिती न देण्याचाच उद्देश स्पष्टपणे दिसतो. हे सर्व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा भंग करणारे व या नियमात अभिप्रेत असलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या तत्त्वाशी विसंगत असे आहे. वास्तविक सरकारी भूखंडांविषयीच्या व्यवहाराबाबत नागरिकांना सर्व माहिती खुली असली पाहिजे. ती तर ठेवलेलीच नाही. उलट ती न देण्यावरच या प्रकरणी जिल्हा प्रशासनाचा भर दिसतो, याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतात. म्हणून आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) माहिती देण्यास झालेल्या विलंबाबद्दल जन माहिती अधिकाऱ्यांना माहितीचा अधिकार अधिनियम कलम २० अन्वये रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन चिटणीस श्री.पी.डी.सूर्यवंशी व विद्यमान चिटणीस श्री.एन.एल.कुंभारे यांच्याकडून प्रत्येकी रु.१२,५००/- प्रमाणे ही शास्ती मे महिन्याच्या पगारातून, जो जून महिन्यात अदा करण्यात येतो, वसूल करुन ती दि.१०.६.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा

यांनी करुन व संबंधितांचे सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात यासंबंधीच्या नोंदी घेऊन पूर्तता अहवाल आयोगाला दि.१५.६.२००८ पर्यंत पाठवावा. यातील कोणी सेवानिवृत्त झाले असल्यास सेवानिवृत्तीचे वेतनातून सदर शास्तीची कपात करुन घ्यावी. या बाबीची पूर्तता करण्याची जबाबदारी ही जिल्हाधिकारी, सातारा यांची राहील.

(३) ऊर्वरित पूर्ण माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपीलकर्त्यास द्यावी. संबंधित संचिका उपलब्ध होत नसल्यास त्या ज्यांच्या ताब्यात होत्या, त्यांच्यावर खातेनिहाय कारवाई करुन आवश्यक तर फौजदारी गुन्हा दाखल करावा, असे आदेश जिल्हाधिकारी, सातारा यांना देण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी, सातारा यांनी याबाबतचा पूर्तता अहवाल दि.१५.७.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(४) जिल्हाधिकाऱ्यांच्या सह्या मुळातील कागदपत्रांवर नाहीत व माहिती म्हणून दिलेल्या प्रतींवर आहेत, हे अपीलकर्त्याचे प्रतिपादन लक्षात घेता, जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास मूळ अभिलेखाच्याच प्रती हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात द्याव्यात. सह्यांबाबत काही स्पष्टीकरण असल्यास ते त्यासोबत द्यावे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ८.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी पांडुरंग राऊत
'प्रिय बापू' १७२/९/१०, एस.टी.कॉलनी, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय,
सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६ / सातारा[redacted] /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी पांडुरंग राऊत
'प्रिय बापू' १७२/९/१०, एस.टी.कॉलनी, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री.रमेश चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एन.एल.कुंभारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.४.२००७ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | जमीन महसूल अधिनियम अंतर्गत बी टेन्युअर ( ब सत्ता प्रकार )सरकारी भूखंड कोणत्या संस्था, कोणत्या व्यक्तींना मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यास विक्री परवानगी दिल्याची आदेशपत्रे, बी टेन्युअरच्या सरकारी भूखंडाची निर्धारित केलेल्या मूल्यांकनाची व जमा महसूलाची भूखंड व सर्व्हेनंबरनिहाय माहिती |

## विवेचन

जमीन महसूल अधिनियमांतर्गत 'ब' सत्ता प्रकारचे सरकारी भूखंड कोणत्या संस्थांना / व्यक्तींना मंजूर करण्यात आले, त्याबाबतची आदेशपत्रे, मूल्यांकन, विक्री परवानगी दिल्याची आदेशपत्रे इ. माहिती अपीलकर्ता श्री.शिवाजी पांडुरंग राऊत यांनी जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांच्याकडे मागितली होती. मे २००० ते जानेवारी २००७ या कालावधीतील माहितीची मागणी त्यांनी केली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.पी.डी.सूर्यवंशी यांनी 'ब' टेन्युअर हा सत्ताप्रकार जमीन महसूल अधिनियमातील नसून तो सिटी सर्व्हे मॅन्युअल १२५ मधील आहे, असे नमूद करुन नेमकी कोणती माहिती हवी आहे हे स्पष्ट होत नसल्याचे कारण देऊन अर्ज निकाली काढला. तसेच नेमकी कोणती माहिती हवी आहे याबाबत मर्जीतर फेरअर्ज करावा, असे श्री.राऊत यांना कळविले. त्याविरुध्द श्री.राऊत यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अपील केले. मागणी केलेल्या माहितीमध्ये कोठेही मोघमपणा नाही, सुस्पष्टता आहे, त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर चुकीचे आहे. तसेच माहिती देणे आवश्यक आहे, असे नमूद करुन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री.अशोक काकडे यांनी अपील मान्य केले. त्यानंतर त्यावेळचे जन माहिती अधिकारी श्री.एन.एल.कुंभारे यांनी दि.३.४.२००७ रोजी श्री.राऊत यांना पत्र पाठवून माहिती देण्यासाठी १५ दिवसांच्या कालावधीची मागणी केली. दि.१७.५.२००७ रोजी श्री.राऊत यांना त्यांनी शुल्क कळविले. हे शुल्क भरल्यानंतर दि.२१.५.२००७ रोजी श्री.राऊत यांना काही माहिती पुरविण्यात आली व 'संचिका उपलब्ध नसल्यामुळे उर्वरित

माहिती देता येत नाही', असे श्री.कुंभारे यांनी कळविले. त्याविरुध्द श्री.राऊत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षेतील सातारा शहरातील 'ब' सत्ता प्रकाराच्या भूखंडामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून शासनाचा महसूल बुडविला गेला आहे. मनमानी पध्दतीने मूल्यांकन केले आहे व जमीन महसूल अधिनियमाचे उल्लंघन करुन सातारा शहरात जमीन नाही असे खोटे दाखले सादर करुन भूखंडाची देवघेव करण्यात आली आहे. भूखंड हस्तांतर प्रक्रियेतील हे गैरप्रकार लपविण्यासाठीच संचिका उपलब्ध होत नसल्याचे कारण पुढे केले जात आहे, असे श्री.राऊत यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. मुळात मागणी सुस्पष्ट नसल्याचे कारण देऊन जन माहिती अधिकाऱ्यांनी पुन्हा अर्ज करण्यास सांगणे, अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी आणखी १५ दिवसांची मुदत मागणे, दि.३.४.२००५ अशी तारीख नमूद असलेले पत्र प्रत्यक्षात दि.८.५.२००७ रोजी पाठविले जाणे व शुल्क भरल्यानंतरही अपुरी माहिती दिली जाणे हे सर्व काळकाढूपणाचे, भ्रष्टाचार दडवू पाहणारे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा भंग करणारे आहे, असे प्रतिपादन श्री.राऊत यांनी केले. उपलब्ध माहिती दिल्याचे व ऊर्वरित माहिती देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एन.एल.कुंभारे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री.रमेश चव्हाण यांनी सांगितले.

२२ भूखंडांच्या विक्री परवान्याचे आदेश झाले, परंतु १३ भूखंडांचीच माहिती दिली आहे, त्यात एका आदेशाच्या दोन व एका आदेशाच्या तीन प्रती दिल्या आहेत. तसेच काही मूळ कार्यालयीन प्रतींवर जिल्हाधिकाऱ्यांची सही नाही, मात्र माहिती म्हणून दिलेल्या प्रतींवर त्यांची सही आहे. याचा अर्थ स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच भूखंडांच्या मूल्यांकनातही तफावत आहे, असे प्रतिपादन श्री.राऊत यांनी केले. उपस्थित अधिकारी याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता पुढील बाबी स्पष्ट होतात :

जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर व त्यानंतर देण्यात आलेली माहिती लक्षात घेता संबंधित भूखंड व्यवहाराबाबत पारदर्शकता दिसून येत नाही. तसेच माहिती देणे टाळण्याकडेच कल दिसून येतो. एवढ्या महत्त्वाच्या विषयातील मागील सहा-सात वर्षांच्या काळातील संचिका उपलब्ध होत नाहीत हा माहिती दडपण्याचाच प्रकार आहे. पाच-सहा वर्षांपूर्वीच्या संचिका ही 'जुनी माहिती' असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. माहितीची मागणी सुस्पष्ट असताना ती मोघम असल्याचे तकलादू कारण देऊन जन माहिती अधिकारी श्री.सूर्यवंशी यांनी माहिती नाकारली, अपिलीय प्राधिकारी यांनी सूचना दिल्यानंतरही पूर्ण माहिती दिली गेली नाही, 'उपलब्ध' माहिती दिल्याचा खुलासा करतानाच संचिका उपलब्ध होत नसल्याचे कळविले. हे सारे लक्षात घेतले, की माहिती न देण्याचाच उद्देश स्पष्टपणे दिसतो. हे सर्व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा भंग करणारे व या नियमात अभिप्रेत असलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या तत्त्वाशी विसंगत असे आहे. वास्तविक सरकारी भूखंडांविषयीच्या व्यवहाराबाबत नागरिकांना सर्व माहिती खुली असली पाहिजे. ती तर ठेवलेलीच नाही, उलट ती न देण्यावरच या प्रकरणी जिल्हा प्रशासनाचा भर दिसतो, याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतात. म्हणून आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) माहिती देण्यास झालेल्या विलंबाबद्दल जन माहिती अधिकाऱ्यांना माहितीचा अधिकार अधिनियम कलम २० अन्वये रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन चिटणीस श्री.पी.डी.सूर्यवंशी व विद्यमान चिटणीस श्री.एन.एल.कुंभारे यांच्याकडून प्रत्येकी रु.१२,५००/- प्रमाणे ही शास्ती मे महिन्याच्या पगारातून, जो जून महिन्यात अदा करण्यात येतो, वसूल करुन ती दि.१०.६.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा

यांनी करुन व संबंधितांचे सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात यासंबंधीच्या नोंदी घेऊन पूर्तता अहवाल आयोगाला दि.१५.६.२००८ पर्यंत पाठवावा. यातील कोणी सेवानिवृत्त झाले असल्यास सेवानिवृत्तीचे वेतनातून सदर शास्तीची कपात करुन घ्यावी. या बाबीची पूर्तता करण्याची जबाबदारी ही जिल्हाधिकारी, सातारा यांची राहील.

(३) ऊर्वरित पूर्ण माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपीलकर्त्यास द्यावी. संबंधित संचिका उपलब्ध होत नसल्यास त्या ज्यांच्या ताब्यात होत्या, त्यांच्यावर खातेनिहाय कारवाई करुन आवश्यक तर फौजदारी गुन्हा दाखल करावा, असे आदेश जिल्हाधिकारी, सातारा यांना देण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी, सातारा यांनी याबाबतचा पूर्तता अहवाल दि.१५.७.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(४) जिल्हाधिकाऱ्यांच्या सह्या मुळातील कागदपत्रांवर नाहीत व माहिती म्हणून दिलेल्या प्रतींवर आहेत, हे अपीलकर्त्याचे प्रतिपादन लक्षात घेता, जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास मूळ अभिलेखाच्याच प्रती हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात द्याव्यात. सह्यांबाबत काही स्पष्टीकरण असल्यास ते त्यासोबत द्यावे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ८.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र भिकाजी नार्वेकर,
अंबोली,देवी , माळी कॉलनी,
जिल्हा - कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार,
ता. मावळ, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
नायब तहसीलदार, ता.मावळ,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्र. | १५७ |
| २ | जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.०१.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०४.०५.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

स.नं.७४/१/४ प्लॉट नं.११ क्षेत्र ५२६.०२ हा मौजे वराळे,ता.मावळ येथे जमीन अपिलकर्त्यानी खरेदी केली असून खरेदीखताप्रमाणे ७/१२ उता-यास नोंद होणे बाबत.

## विवेचन

श्री.रामचंद्र भिकाजी नार्वेकर, जिल्हा कोल्हापूर यांनी जमीन सर्व्हे नं.७४/१/४ प्लॉट नं.११,क्षेत्र ५२६.०२ चौ.मी. मौजे, वराळे,ता.मावळ, जि.पुणे येथे खरेदी केली असून सदर खरेदी नोंदीबाबतची कार्यवाही न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले होते. सदर अपिलाच्या अनुषंगाने तहसीलदार, मावळ यांनी आयोगाकडे दि.१४.११.२००७ रोजी सादर केलेल्या उत्तरामध्ये नोंदीबाबतची कार्यवाही पूर्ण केलेली असल्याचे नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ०६.०५.२००८

अ.क्र. १६ **राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

६५

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:१६ /कोल्हापूर /२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.संपत पांडुरंग आबदार<br>'अवधूत' जयभवानी कॉलनी, रिंगरोड,<br>फुलेवाडी, कोल्हापूर ४१६०१० |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :सहा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर |

अपीलकर्ता यांना दि.२४.९.२००६ रोजी माहिती पुरविण्यात आलेली आहे. सदरहू प्रकरणी जी पत्रे उपलब्ध होत नाहीत ती देण्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. दि.७.४.२००८ अखेर अपेक्षित माहिती देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) उभयमान्य झाल्याप्रमाणे दि.७.४.२००८ पर्यंत माहिती दिल्याबाबतचा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. १६.५.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

२३ १६३
३/१५



# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.भिमगोंडा शिरगोंडा पाटील
मु.पो.सुळकुड, ता.कागल, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक ( साखर ),
कोल्हापूर विभाग, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
छत्रपती सहकारी साखर कारखाना लि.कागल,
ता.कागल, जि. कोल्हापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | १६३/कोल्हापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | १३.५.२००८ |

३.उपस्थित

अपीलकर्ता श्री.भिमगोंडा शिरगोंडा पाटील
मु.पो.सुळकुड, ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक ( साखर ),
कोल्हापूर विभाग, जि.कोल्हापूर श्री.डी.एस.साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
छत्रपती सहकारी साखर कारखाना लि.कागल,
ता.कागल, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री.पी.व्ही.काकडे

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | दि.२१.६.२००६ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि.२१.७.२००६ |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | दि.७.८.२००६ |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि.-- |
| ८. **मूळ मागणीचा तपशील**<br>दि.३१.३.२००५ रोजी झालेल्या कारखाना जनरल सभेचे प्रोसीडिंग. दि.१६.३.२००६ रोजीचे जनरल सभेचे प्रोसीडिंग. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.भिमगोंडा शिवगोंडा पाटील यांनी दि.२१.६.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, शाहू साखर कारखाना लि.कागल यांच्याकडे दि.३१.३.२००५ व १६.३.२००६ रोजीचे कारखान्याचे जनरल प्रोसीडिंगची नक्कल मिळणेकामी अर्ज केला होता. दि.२१.७.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी कारखान्याची कोणतीही सभा झालेली नाही. जी माहिती उघड करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी कोणताही संबंध नसेल किंवा जी माहिती व्यापक लोकहिताच्या दृष्टीने उघड करणे समर्थनीय आहे अशी खात्री पटल्याखेरीज अशी माहिती देणे अडचणीचे आहे, सबब आपला अर्ज फाइल करण्यात आला आहे, असे उत्तर दिले. यावर अपीलकर्ता यांनी प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग यांच्याकडे अपील दाखल केले. परंतु अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग यांच्याकडून कोणताही आदेश न मिळाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी या अपिलाची सुनावणी कोल्हापूर येथे ठेवली होती. यावेळी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी सुनावणीस हजर होते.

मागितलेली माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता श्री.भिमगोंडा शिवगोंडा पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी मान्य केले, व आपली तक्रार राहिलेली नसल्याचे निवेदन केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असल्याने व तक्रार राहिली नसल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

कोल्हापूर
दि.१३.५.२००८

७५)१६ १९६८, २८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:१७२+१७४+१२८ /कोल्हापूर /२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.संपत पांडुरंग आबदार<br>'अवधूत' जयभवानी कॉलनी, रिंगरोड,<br>फुलेवाडी, कोल्हापूर ४१६०१० |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर |

अपीलकर्त्याला सर्व माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे आहे. अपीलकर्त्यास संकल्पचित्र व बारचार्टही तपासून देण्याचे ठरले. भ्रष्टाचार झाला आहे असे गृहीत धरुन अपीलकर्त्याने कार्यवाहीची मागणी करणे हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. त्यामुळे त्याची दखल घेता येणार नाही. शेरेवजा भाष्यापेक्षा सप्रमाण व नेमकेपणाने माहिती मागणे अपेक्षित आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.
(२) अपीलकर्त्या जन माहिती अधिकारी यांनी संकल्पचित्र व बारचार्ट तपासून द्यावा व पूर्तता अहवाल हे आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांचे आत आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. १६.५.२००८**

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**